## स्थायी समिती
## दाखल विषय – दि. २९/५/२०१८

**विषय क्रमांक :– १९१ त्वर्य**

प्रभाग क्र. ३१ ब मधील नव्याने ताब्यात आलेले स.नं. ९ मधील शाळेची आरक्षण असलेली २ एकर जागेवर ई–लर्नींग स्कूल विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ६ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.दिपार्थ इन्फ्रास्ट्रक्चर यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९९,९७,६४९/– पेक्षा ३.२०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ९६,७७,७२४=२३ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/८१ दि. २५/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १९२ त्वर्य**

आरोग्य खात्याकडील कमला नेहरू रूग्णालय व डॉ.नायडू रूग्णालय यांना अनुक्रमे अंदाजे लागणारे ४३८०० लिटर्स व ९१२५ लिटर्स दूध दि.१/४/२०१८ ते ३१/३/२०१९ या मुदतीसाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठ्यानुसार प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर गाईचे दूध रू.३७=२५ या दराने होणारी र.रू.१९,७१,४५६/– (अक्षरी–रू.एकोणिस लाख ऐकाहत्तर हजार चारशे छपन्न फक्त) पर्यत अगर रूग्णालयातील रूग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ होत असते. शासन वेळोवेळी दर बदलत असते त्याप्रमाणे जादा दूध लागल्यास शासकीय दूध योजनेकडे उपलब्ध असलेल्या साठयानुसार वेळोवेळी कमी/जास्त प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर त्याप्रमाणे होणाऱ्या रकमेपर्यत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम शेड्यूल चॅप्टर ५(२)(२) नुसार दूध पुरविण्यासाठी शासकीय दूध योजना, पुणे यांचेकडून करारनामा न करता दूध खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/आरोग्य/८५ दि. २८/५/२०१८ चे पत्र.

(टिप – सदर खरेदी र.रू.३०००/– पेक्षा जास्त होत असल्याने मनपा अधिनियमानुसार टेंडर्स मागविणे जरूरीचे आहे. तथापी ही खरेदी राज्य शासनाच्या अधिकृत अशा शासकीय दूध योजनेकडून होत असल्याने व यापेक्षा कमी दर येण्याची शक्यता नसल्याने ही खरेदी शासकिय दूध योजना, पुणे ( गर्व्हनमेंट मिल्क सप्लाय स्किम ) यांचेकडून टेंडर न काढता खरेदी करणेत येत आहे.)

**विषय क्रमांक :– १९३ त्वर्य**

कुटूंब कल्याण कार्यक्रमाअंतर्गत महापालिका सेवकांना एक अपत्यावर कुटूंब नियोजन केल्या प्रित्यर्थ दिलेल्या दोन जादा वेतनवाढी बाबत वस्तुस्थिती व ज्यादा वेतनवाढ मंजूर करण्याचे अधिकार मे.शासनास असल्याची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूद विचारात घेऊन मा.महापालिका सभेचे ठराव क्र. ५९० दि.२८/२/२०११ अन्वये प्राप्त मंजुरीनुसार ज्या महानगरपालिका अधिकारी/सेवकांना यापूर्वीच सदर वेतनवाढी मंजूर करुन देण्यात आल्या आहेत अशा सर्व सेवकांच्या मंजूर केलेल्या/देण्यात आलेल्या वेतनवाढी दिलेल्या दिनांकापासून रद्द करणेस आणि त्या वेतनवाढी देय ठरत नाहीत असे समजून त्यांचे वेतनाचे फेरनिश्चितीकरण करणेस, अतिप्रदान झालेली वेतन रक्कम सुसह्य मासिक हप्त्यांमध्ये पुणे महानगरपालिका कोषात जमा करुन घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/साप्र/८७ दि.२९/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :– १९४ त्वर्य**

येरवडा कळस धानोरी क्षेत्रिय कार्यालयांतर्गत येणाऱ्या पुणे मनपाच्या शाळांची देखभाल व दुरुस्ती विषयक कामे करणे (भाग–३) कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ७ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.नरेंद्र कन्स्ट्रक्शन यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ७५,००,०००/– पेक्षा १५% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ६३,७५,०००/– पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत करुन होणाऱ्या कमी/अधिक रक्कमेपर्यंत काम करुन घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/८९ दि. २९/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :- १९५ त्वर्य**

मनपा शाळा क्र. ८३ मुलांची इंग्रजी माध्यम डी.पी.रोड हडपसर पुणे येथील शाळा अद्ययावत करणे इमरतीचा मजला वाढविणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ३ टेंडर्सपैकी ठेकेदार मे.अभिजीत एंटरप्राईजेस यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु. ९३,१४,८१५=६० पेक्षा ६.५०% कमी) असल्याने त्यांचेकडून र.रु. ८७,०९,३५२=५८ पर्यंत अधिक भाववाढ सुत्रानुसार आणि विशेष भाववाढ सुत्रानुसार निर्धारित केलेल्या सिमेंट व लोखंड यांचे बेसिक दरातील प्रत्यक्ष फरकानुसार होणारी वाढ अथवा घट ही अट स्विकृत होऊन टेंडर अटी शर्तीनुसार काम करून घेणेस व त्यापोटी त्यांचेशी करारनामा करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे क्र. मआ/भवन/९० दि. २९/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :- १९६ त्वर्य**

पुणे महानगरपालिकेतर्फे नगरसचिव कार्यालयामार्फत विविध समारंभ, उद्घाटने, जयंती व पुण्यतिथी समारंभ इत्यादींसाठी लागणारे पुष्पहार, पुष्पगुच्छ व फुलांचे तोरण पुरविणे. छायाचित्रे, व्हिडिओ शुटींग करणे तसेच स्मृतिचिन्हे पुरविणे याकामी प्रतिवर्षी टेंडर्स काढण्यात येतात. सन २०१७-१८ मध्ये देखील ऑनलाईन पद्धतीने सदर बाबींसाठी टेंडर्स मागविण्यात आले होते. परंतु सदर टेंडर प्रक्रिया पूर्ण होवून प्रशासकीय मान्यतेच्या स्तरावर असतानाच संदर्भ क्र.१ अन्वये, मे. उच्च न्यायालयाचे ‘ सण व सोहळ्यांवर महानगरपालिकेकडून खर्च न करण्यातबाबत ’ आदेश प्राप्त झाले. मा.उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेल्या आदेशांमध्ये महानगरपालिकेकडून सण व सोहळ्यांवर खर्च न करण्याबाबत सांगण्यात आल्याने सन २०१७-१८ ची टेंडरप्रक्रिया प्रशासकीय मान्यतेच्या स्तरावर मे. महाराष्ट्र शासन यांचेपुढील आदेश येईपर्यंत स्थगित करण्यात आली. संदर्भ क्र. २ अन्वये मे. महाराष्ट्र शासन यांचेमार्फत महानगरपालिकांनी त्यांचेकडील निधी विविध उत्सवांसाठी खर्ची करण्यापूर्वी अधिनियमातील कलम ६३ व ६६ ची पूर्तता होत असल्याची खातरजमा करून, दि. ०२/८/२०१७ रोजीच्या मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे यथायोग्य पालन होईल याची दक्षता घेण्याचे आदेश दिले.

सदर कालावधीमध्ये आदेशामध्ये सुस्पष्टता येईपर्यंत उद्घाटने, भुमिपूजन समारंभ, सत्कार समारंभ, मानपत्र देवून खास सत्कार, पुरस्कार वितरण समारंभ हे स्थगित करण्यात आले होते. परंतु सदर कालावधीत थोर पुरूषांच्या जयंती/पुण्यतिथीचे कार्यक्रम करणे क्रमप्राप्त असल्याने, या दरम्यानच्या कालावधीत साजऱ्या करण्यात आलेल्या जयंती/पुण्यतिथीच्या कार्यक्रमप्रसंगी पुष्पहार व फोटोंची व्यवस्था नगरसचिव कार्यालयामार्फत करण्यात आली होती. सदर जयंती/पुण्यतिथीचे कार्यक्रम थांबविणे ही केवळ अशक्य बाब आहे आणि सदर जयंती/पुण्यतिथीचे कार्यक्रम हे मे. महाराष्ट्र शासन यांचेमार्फत वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या शासकीय परिपत्रकानुसारच साजरे करण्यात येतात. थोर पुरूषांच्या जयंती/पुण्यतिथी साजरे करणे बंधनकारक असल्याने तद्प्रसंगी पुष्पहार व छायाचित्रे यांची व्यवस्था करणे हे देखील आवश्यक होते. त्या अनुषंगाने सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षातील टेंडर्सना प्रशासकीय मान्यता मिळाली नसताना पुष्पहार पुरविणे व छायाचित्रे काढण्याची कामे मागील जुन्या ठेकेदारांकडून, जुन्याच टेंडरमान्य दरांनी करून घेण्यात आली. मे. राज्य शासनाच्या आदेशानंतर २९ नोव्हेंबर २०१७ नंतर ३१ मार्च २०१८ पर्यंतच्या कालावधीत साजऱ्या करण्यात आलेल्या जयंती / पुण्यतिथी निमित्त पुष्पहार व छायाचित्रांबाबतच्या बिलांस संदर्भ क्र.३ अन्वये मा. अति. महापालिका आयुक्त ( ई ) यांची प्रशासकीय मान्यता घेण्यात आली. मे. गिरीश गिरीजा डेकोरेटर्स यांनी पुष्पहार पुरविणेबाबत सदर कालावधीत र.रू. ६८,८६०/- फक्त ची बिले सादर केलेली आहेत. तर मे. टाईम्स व्हिजन यांनी सदर कालावधीत छायाचित्रे काढणे कामी र.रू. ५९,३८०/- फक्त ची बिले सादर केलेली आहेत. मे. गिरीश गिरीजा डेकोरेटर्स आणि मे. टाईम्स व्हिजन यांची एकूण र.रू. १,२८,२४०/- ची बिले संबंधितांना अदा करण्यास संदर्भ क्र.३ अन्वये, प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे.

तरी २९ नोव्हेंबर २०१७ ते ३१ मार्च २०१८ या कालावधीत साजऱ्या करण्यात आलेल्या जयंती/पुण्यतिथी कार्यक्रमांप्रित्यर्थ पुरविण्यात आलेल्या पुष्पहार व छायाचित्रे यांबाबतची मे. गिरीश गिरीजा डेकोरेटर्स यांचे र.रू. ६८,८६०/- आणि मे. टाईम्स व्हिजन यांचे र.रू. ५९,३८०/- अशी एकूण र.रू. १,२८,२४०/- ची बिले अदा करण्यास पश्चात मान्यता मिळणेबाबत मा.नगरसचिव यांचे क्र. १३६९ दि. २८/५/२०१८ चे पत्र.

**विषय क्रमांक :- १९७ त्वर्य**

मा.योगेश ससाणे व मा.अशोक कांबळे यांचे दि. २४/५/२०१८ चे पत्र.

संपूर्ण महाराष्ट्राचे प्रेरणास्थान असणारे गीतरामायण महाकवी, असंख्य अविट चित्रपटांचे गीतकार कै.ग.दि.माडगूळकर यांचे स्मारक मुळा नदीकाठी व्हावे असा प्रयत्न गेल्या काही वर्षांपासून सुरू आहे. पुणे महापालिकेच्या सन २००८-२००९ पासूनच्या पाच अंदापत्रकांमध्ये त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात आली होती. हा प्रेरणादायी प्रकल्प पूर्ण व्हावा यासाठी राज्य शासनाने देखील पुढाकार घेवून बैठक घेवून यासदंर्भातील अडचणी दूर करणेसाठी निश्चितपणे प्रयत्न केला. मात्र दुर्देवाने हा प्रकल्प अद्यूाप मार्गी लागलेला नाही.

१ एप्रिल १९५५ रोजी गीतरामायणाचे प्रसारण सुरू झाले. सन २०१५-२०१६ हे वर्ष गीतरामायणाचे हिरक महोत्सव म्हणून गणले गेले. या ऐतिहासिक व महत्वपूर्ण टप्प्याच्या पार्श्वभूमीवर कै.ग.दि.माडगूळकर यांचे यथोचित स्मारक पूर्ण होणेसाठी पुणे महानगरपालिकेने पुढाकार घेवून सर्व अडचणी व अडथळयांचे तातडीने निराकरण करणेसाठी हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करून पुण्याच्या सांस्कृतिक वैभवात भर घालावी अशी पुणेकरांची देखील भावना आहे.

याप्रकल्पाची सविस्तर माहिती खालीलमाणे-

१.पुणे मनपाच्या हददीतील वाकडेवाडी स.नं.१३ व २४ ते २९ पैकी मुळा नदीकाठच्या सुमारे २ किमी लांबीच्या व सरासरी ३० मी.रूंदीच्या हरितपट्टयाच्या जागेत कै.ग.दि.माडगूळकर यांचे स्मारक व उद्यान प्रस्तावित आहे. यासाठी पुणे मनपाने सन २००८-२००९ च्या अंदाजपत्रकात २.७१ कोटी तरतूद केली होती. सदर तरतूदीमधून नदीलगत ४७५ मी. लांबीची संरक्षक भिंत बांधण्यात आली असून त्यास २.३८ कोटी खर्च करण्यात आला आहे. सन २०११-२०१२ च्या अंदाजपत्रकात १.२० कोटी, सन २०१२-२०१३ च्या अंदाजपत्रकात २० लक्ष, सन २०१३-२०१४ मध्ये २ कोटी इ.तरतूद करण्यात आली होती.

२.कै.ग.दि.माडगूळकर यांचे नियोजित असलेल्या स्मारक व उद्यानास सुमारे ४९५५० चौ.मी.जागा आवश्यक असून त्यापैकी सुमारे १५२५० चौ.मी. जागा पुणे मनपाच्या ताब्यात आलेली आहे. सदर ताब्यात असलेल्या जागेपैकी ३७५० चौमी. जागेवर मैलापाणी शुध्दीकरण केंद्र आहे. २८०० चौमी जागा खाजगी मालकीची व उर्वरित ३१५०० चौमी जागा विविध शासकीय विभागांच्या मालकीची आहे. सदर शासकीय जागा ताब्यात घेणेकामी पुणे मनपाने सातत्याने पत्रव्यवहार व पाठपुरावा केलेला असून अद्याप त्याबाबत कोणतीच कार्यवाही विविध शासकीय विभागांकडून करण्यात आली नाही.

३.नियोजित स्मारकाची जागा ही नदीलगत असल्याने जागा हस्तांतरित करण्यापूर्वी रेडलाईन, ब्लूलाईन बाबत पाटबंधारे विभागाकडून खातरजमा करणे आवश्यक आहे. मे.हरित लवाद यांचे विविध नदीलगतच्या विकसनाबाबतचे नियम, अटी व निकाल पाहता सदर जागेवर प्रस्तावित कै.ग.दि.माडगूळकर यांचे स्मारक व उद्यान अडचणीचे होत आहे.

पुणे महानगरपालिका हद्दीमध्ये पेठ हडपसर स.नं.९५ इंडस्ट्रियल टाऊन प्लानिंग क्र.२ रामटेकडी फायनल प्लॉट क्र.१०४/२ यांसी क्षेत्र ५४३७१.४८ चौमी (आरक्षण MP- ३३) म्युनिसिपल पर्पजकरिता ही जागा टीडीआर पोटी दि.६.१.२०१८ रोजी टी.डी.आर च्या मोबदल्यात मनपाच्या ताब्यात आलेली असून या जागेवर कै.ग.दि.माडगूळकर स्मारक व उद्यान करणेचे नियोजित केल्यास प्रस्तावित स्मारक व उद्यानासाठी आवश्यक असणारी जागेचे क्षेत्रफळ हे सुमारे ४९५५० चौ.मी होते व सदर जागा ही त्यापेक्षा जास्त आहे. तसेच ही जागा पुणे मनपाच्या ताब्यात असून या जागेच्या संपादनासाठी महापालिकेला जागा संपादनाचा खर्च होणार नाही. ही जागा 'म्युनिसिपल पर्पजसाठी' आरक्षित असल्याने या जागेवर कै.ग.दि.माडगूळकर स्मारक व उद्यान करणेस कोणतीही अडचण येणार नाही.

१ ऑक्टोबर २०१८ रोजी ग.दि.माडगूळकर यांचे जन्मशताब्दी वर्ष सुरू होत आहे. या जन्मशताब्दी वर्ष काळात ग.दि.माडगूळकर स्मारक व उद्यान प्रकल्प मार्गी लागल्यास त्यांना पुणेकरांकडून ख-या अर्थाने आदरांजली ठरेल. पुणे शहर हे सांस्कृतिक शहर असल्याने ग.दि.माडगूळकर स्मारक व उद्यान पुणे शहरात केल्यास शहराच्या वैभवामध्ये भर पडणार आहे. तरी हडपसर येथील 'म्युनिसिपल पर्पजसाठी' आरक्षित जागेवर कै.ग.दि.माडगूळकर स्मारक व उद्यान विकसित करण्यात यावे. यासाठी र.रु. १० कोटीची तरतुद करण्यात यावी.

**विषय क्रमांक :- १९८ त्वर्य**

मा.बापूराव कर्णेगुरुजी, मा.सौ.मुक्ता जगताप, मा.सौ.श्वेता गलांडे (खोसे) व मा.राहुल भंडारे यांचे दि.२५/५/२०१८ चे पत्र.

पुणे पेठ लोहगाव विमाननगर प्रभाग क्र.३ मधील जॉगरपार्क उद्यानात जेष्ठ नागरीक संघाचे सातत्याच्या मागणीनुसार २००६ साली मा.आमदार चंद्रकांत छाजेड साहेबांनी आमदार फंडातून २०X३५ फूट या साईजचे दोन हॉल बांधले काम पूर्ण झाल्यावर उद्घाटनाचा मोठा कार्यक्रम घेऊन हे दोन्ही हॉल विमाननगर मधील जेष्ठ नागरीकांचे संघास देत असल्याचे जाहीर करून दोन्ही हॉलच्या चाव्या जेष्ठ नागरीक संघाचे अध्यक्षांचे ताब्यात २८ मार्च २००६ रोजी दिल्या.

दोन हॉलपैकी १ हॉलमध्ये ग्रंथालय + पुरूषांसाठी योगा सुरू केला दुसरा हॉल जेष्ठ महिलांना योगा व इतर व्यायामासाठी दिला.

त्यावेळेपासून या दोन्ही हॉलची देखभाल दुरूस्ती, रंगरंगोटी, दैनंदिन सफाई, लाईट बिले इत्यादी खर्च तसेच ग्रंथालयासाठी हिन्दी, मराठी, इंग्रजी भाषेतील कथा, कांदब-या, थोरामोठयांची चरित्रे, वैज्ञानिक खेळाडू, यशस्वी उद्योगपतींचे चरित्रे, संशोधनात्मक, मनोरंजनात्मक, नवीन टेक्नॉलॉजी बाबतची अशी विविध प्रकारची जवळ जवळ ५००० पुस्तके घेतली. तसेच रोज ६ वर्तमानपत्रे जेष्ठ नागरिक संघाकडून पुरविली जातात.

गरजूंना रेशनकार्ड, पॅनकार्ड, आधारकार्ड, मतदार यादीत नावे नोंदविणे इ.समाजसेवी कामे जेष्ठ नागरिक संघाकडून केली जातात.

या जेष्ठ नागरिक संघात माजी सैनिक व सामाजिक दृष्टया दुर्बल घटकांतील नागरिकांची संख्या मोठी आहे. तसेच या जेष्ठ नागरिकांच्या ताब्यात दिलेल्या हॉलमध्ये देखभाल दुरुस्तीसह १२ वर्षे विनातक्रार काम काज चालू होते. गार्डनच्या संध्याकाळचे वेळेनुसार दोन्ही हॉलचा वापर सुरु होता. केवळ काही लोकांना जेष्ठ नागरीकांची शिस्त आवडली नाही. त्यामुळे तक्रारी झाल्या व हॉल वापरण्यास अचानक बंद केला.

तरी जागा वाटप नियमावली २००८ नुसार संयुक्त प्रकल्पातील भाग १० अनुक्रमांक १ नुसार या दोन्ही हॉलचे क्षेत्रफळ १५०० चौ फुटापेक्षा कमी आहे.म्हणून पुणे महानगरपालिका व जेष्ठ नागरिकांचे उतार वयातील जगणे आनंदी करण्यासाठी विविध उपक्रम व उतार वयातील उत्तम आरोग्य कसे राखावे, जेष्ठ नागरिक आनंदी जगणे आयुष्य कसे वाढविते यासाठी या क्षेत्रात काम करणारे उत्तम व्याख्याते आणून जेष्ठाचे प्रबोधन करणारा जेष्ठ नागरिक संघ यांच्या संयुक्त प्रकल्पातून उत्तम समाज उपयोगी प्रकल्प चालविला जाणार आहे.

याचा विचार करून पुणे महानगरपालिका व विमाननगर जेष्ठ नागरिक संघ यांचा संयुक्त प्रकल्प म्हणून व्यवस्थापन व देखभाल दुरूस्तीसाठी सदर दोन्ही हॉल पूर्वीप्रमाणे जेष्ठ नागरिक संघास वापरण्यास देण्यास मान्यता मिळावी व नियमानुसार संयुक्त प्रकल्प म्हणून करारनामा करण्यास व स्वामित्वापोटी वार्षिक १ रूपया नाममात्र भाडे भरण्यास, करारनाम्यात किमान ५ वर्षाची मुदत नमूद करण्यास, करारनाम्यातील अटी व शर्तीचे जेष्ठ नागरिक संघाने काटेकोरपणे पालन करणेस मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– १९९ त्वर्य**

मा.राजेश बराटे यांचे दि.२५/५/२०१८ चे पत्र.

पुणे शहरातील शाळा, उद्याने, दवाखाना इतर ॲमिनीटी साठी विकास आराखड्यातील आरक्षणे पुणे महानगरपालिकेने ताब्यात घेताना या आरक्षित जमिनीस संरक्षक भिंती घालण्याचे बंधन आहे. परंतु जमीन मालक महानगरपालिकेस जमीन ताब्यात देतांना संरक्षक भिंत घालत नाही आणि संरक्षक भिंत घातल्यास सदरील काम अत्यंत हलक्या दर्जाचे करण्यात येते. कालांतराने ज्या प्रकल्पासाठी जमीन ताब्यात घेतली आहे, तो प्रकल्प उभारण्यासाठी पुणे महानगरपालिकेस पुन्हा भक्कम व मजबुत संरक्षक भिंत बांधावी लागते. त्या संरक्षक भिंती बांधण्यास पुणे महानगरपालिकेकडून लाखो रुपये खर्च होतो.

तरी पुणे महानगरपालिकेने जागा ताब्यात घेण्यापुर्वी संबंधित जागा मालकांकडून चांगल्या दर्जाचे संरक्षक भिंती बांधून घेऊन मगच जागेचा ताबा घ्यावा. सदरील संरक्षक भिंती पुणे महानगरपालिकेच्या भवन खात्याच्या स्पेशीफिकेशन प्रमाणे आहे का? हे तपासावे. याबाबतचा अभिप्राय भवन खात्याकडून लेखी स्वरुपात घेतल्यानंतरच टि.डी.आर.खर्ची पडावा हे धोरण १ मार्च २०१८ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २०० त्वर्य**

मा.ॲड्.भैय्यासाहेब जाधव व मा.योगेश ससाणे यांचे दि. २५/५/२०१८ चे पत्र.

**स्वच्छ पुणे हरीत पुणे** ही महानगरपालिकेची संकल्पना आहे.त्याकरिता महानगरपालिकेच्या व राज्य सरकारच्या माध्यमातून दरवर्षी हजारो झाडांचे वृक्षारोपण करुन त्याची जोपासनेसाठी करोडो रुपयांचा खर्च करीत असतो. अनेक मिळकत धारक तसेच सोसायट्या त्यांच्या मिळकतमध्ये वृक्षांची देखभाल करण्यासाठी पाणी व इतर बाबींवर मोठा आर्थिक खर्च करीत असतात.

नागरिकांना **स्वच्छ पुणे हरीत पुणे** या संकल्पनेचे अनुकरण करणे कामी त्यांना महानगरपालिके तर्फे प्रेरणा मिळणेकरिता महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असलेल्या सर्व मिळकतींमध्ये जे नागरिक स्वत:च्या मिळकतींमध्ये किंवा सोसायट्यांमध्ये कमीतकमी २० फुट उंचीचे कमीतकमी १०० झाडे किंवा त्यापेक्षा अधिक झाडांचे संगोपन करीत असल्यास त्याचे महानगरपालिकेच्या उद्यान विभाग प्रमुख यांचे मार्फत सर्वेक्षण करुन त्या मिळकत धारकाच्या करआकारणी मध्ये तसेच पाणी पुरवठ्याच्या बिलामध्ये किमान १०% सवलत देण्यात यावी.

**विषय क्रमांक :– २०१ त्वर्य**

मा.सौ.सुलोचना कोंढरे व मा.जयंत भावे यांचे दि.२८/५/२०१८ चे पत्र.

प्रभाग क्र. १७ (ब) (रास्ता पेठ रविवार पेठ) मधील बुधवार पेठ घरांक ७५३/५४ पिनॅकल हाईट्स फडके हौद येथील इमारतीमध्ये पुणे महानगरपालिकेने आरक्षित केलेल्या जागेस विकसकाकडून ताब्यात घेण्यात आलेली नसून (मालमत्ता व्यवस्थापनाचे जावक क्र. १४२७, दि. २२/५/२०१८) सदर जागेत महिला सक्षमीकरण व नारी सबलीकरण अंतर्गत महिला प्रशिक्षण वर्ग व बचत गटांच्या माध्यमातून महिलांसाठी लघु उद्योग प्रकल्प, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका तसेच समाजातील आर्थिक दुर्बल घटकातील युवक युवतींना रोजगारभिमुख कौशल विकासाचे पप्रशिक्षण पुणे महानगरपालिके मार्फत संयुक्तिकरित्या प्रकल्प चालू करण्यासाठी वरील सदर जागा अतिशय योग्य आहे. ही जागा म.न.पा.ने ताब्यात घेण्यासाठी कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात यावी.

**विषय क्रमांक :- २०२ त्वर्य**

मा.डॉ.सिध्दार्थ धेंड, उपमहापौर व मा.सौ.जयश्री काळे यांचे दि. २८/५/२०१८ चे पत्र.

पुणे महानगरपालिकेमध्ये शिक्षण विभागाच्या वतीने पुणे शहरामध्ये गोर गरीब विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून प्राथमिक शिक्षण दिले जाते. या माध्यमाकडे विद्यार्थ्यांची संख्या वाढतच आहे. परंतू यांना दर्जेदार शिक्षण देणे पुणे महानगरपालिकेमध्ये पुढे मोठे आव्हान आहे. जवळजवळ २०००० विद्यार्थी पुणे महानगरपालिकेच्या इंग्रजी माध्यमाचे शिक्षण घेत आहे. या शाळांमध्ये चांगले शिक्षण देणेकरीता त्यांना आपण एकत्रित १०,०००/- रुपये मानधन दिले जाते. हे मानधन चतुर्थ श्रेणीच्या कर्मचाऱ्यांच्या प्रति दिन पेक्षाही कमी आहे. त्यामुळे आपण शिक्षकांची अवहेलना करीत आहोत.

इतर खाजगी शाळांमध्ये कमीतकमी रुपये ३०,०००/- ते रुपये ३५,०००/- पगार मिळत आहे. नवी मुंबईच्या शिक्षण विभागाने याच महिन्यामध्ये शिक्षकांची भरती करिता मासिक रुपये २०,०००/- इतके मानधन देण्याचे ठरविले आहे. पुणे महानगरपालिका अ वर्ग असूनही आपण त्यांना रुपये १०,०००/- रुपये मानधन देत आहोत.

तरी या शिक्षकांना रुपये २०,०००/- इतके मानधन देणेत यावे.

**सुनिल पारखी**
**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका.**